Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ स.न.८३२–ए, फा.प्लॉ.नं. १७८, १७९, बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११ ००४.

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 & EPABX -25705000 &
Email : secretary.stateboard@gmail.com

क्रमांक रा.मं./परीक्षा-८/१८५५
पुणे - ४११ ००४
दिनांक २९/०५/२०२५

प्रति,
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे,

विषय – माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) पुरवणी परीक्षा जून–जुलै २०२५ अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्काने परीक्षेची आवेदनपत्रे भरण्याच्या तारखांबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, जून–जुलै २०२५ मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) पुरवणी परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची नियमित व विलंब शुल्कासह परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन स्विकारण्याची मुदत दि.२९/०५/२०२५ रोजी संपुष्टात येणार आहे.

आवेदनपत्र सादर करण्याची विलंब शुल्काची निर्धारीत मुदत संपल्यानंतर अतिविलंब/विशेषअतिविलंब/ अतिविशेष अतिविलंब शुल्काने परीक्षेची आवेदनपत्र स्विकारण्याच्या तारखा व इतर तपशीलवार माहिती खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

अतिविलंब शुल्क मुदत (रू.५०/– प्रतिदिनी,प्रतिविद्यार्थी प्रमाणे)	विशेष अतिविलंब शुल्क मुदत (रू.१००/–प्रतिदिनी,प्रतिविद्यार्थी प्रमाणे)	अतिविशेष अतिविलंब शुल्क मुदत (रू.२००/–प्रतिदिनी,प्रतिविद्यार्थी प्रमाणे)
शुक्रवार दि.३०/०५/२०२५ ते शनिवार दि.०७/०६/२०२५	रविवार दि.०८/०६/२०२५ ते रविवार दि.१५/०६/२०२५	सोमवार दि. १६/०६/२०२५ ते सोमवार दि. २३/०६/२०२५

१.सदर आवेदनपत्र माध्यमिक शाळांनी ऑनलाईन पद्धतीने (www.mahahsscboard.in) या संकेतस्थळावर भरावयाची आहेत. आवेदनपत्र online भरलेल्या विद्यार्थ्यांचे अतिविलंब, विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्क online चलन तयार करून चलनावर नमुद ICICI बॅंकेच्या Virtul Acount मध्ये कोणत्याही बॅंकेद्वारे त्याच दिवशी online पद्धतीने जमा करण्यात यावे. रक्कम जमा केल्यानंतर त्या चलनामधील सर्व विद्यार्थ्यांच्या Application Status मध्ये Send to board व Payment Status मध्ये Paid असा बदल झाला आहे का याची खातरजमा करावी. असे Status प्राप्त झालेली आवेदनपत्रेच ग्राहय धरण्यात येतील. विभागीय मंडळाने अशी आवेदनपत्रे व चलने स्विकारून व त्याचे Status ची खात्री करून पुढील कार्यवाही करावी. माध्यमिक शाळांनी चलन उशीरा भरल्याचे निदर्शनास आल्यास संबधित विलंबाची यथायोग्य फी संबधित माध्यमिक शाळांकडून घेण्यात यावी.

२.त्याचप्रमाणे आवेदनपत्रामध्ये नाव/जन्मतारीख/विषय/माध्यम याबाबत Prilist च्या दुरूस्त्या राहिलेल्या असल्यास प्रचलित पद्धतीने (Offline) विहित शुल्कासह जमा करुन घेणेबाबत माध्यमिक शाळांना सूचित करण्यात यावे.

३.प्रचलित पद्धतीप्रमाणे विशेष अतिविलंबासह आवेदनपत्रे स्विकारण्याच्या तारखा व सर्व सूचनांचे परिपत्रक संबधित माध्यमिक शाळाप्रमुखांना पाठविण्यात यावे. तसेच पत्रात नमूद केल्याप्रमाणे अतिविलिंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्कानुसार आवेदनपत्रे स्विकारावीत.

४. मात्र अशा विद्यार्थ्यांना विभागीय मंडळ निश्चित करेल त्याच परीक्षा केंद्रावर परीक्षा द्यावी लागेल. तसेच त्यांचा निकाल इतर विद्यार्थ्यांबरोबर जाहीर होवू शकला नाही तरी विद्यार्थी त्यास हरकत घेऊ शकणार नाही, असे विद्यार्थ्याकडून हमीपत्र घेण्यात यावे. ही बाब माध्यमिक शाळांमार्फत विद्यार्थ्यांना सूचित करावी व त्याबाबतची अंमलबजावणी प्राधान्याने करण्यात यावी. कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

(देविदास कुलाळ)
सचिव
राज्यमंडळ, पुणे ४.

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी

१) व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्यमंडळ, पुणे ४.
२) लेखा शाखा, राज्यमंडळ, पुणे ४.

क्र.मुंविमं/माध्य.परीक्षा/२३०७
वाशी, नवी मुंबई-४००७०३.
दिनांक -०३/ ०६ /२०२५

प्रति,
मुख्याध्यापक / प्राचार्य
मुंबई विभागीय कार्यक्षेत्रातील
सर्व मान्यताप्राप्त शाळा/कनिष्ठ महाविद्यालय,
मुंबई /बृन्हमुंबई /ठाणे /पालघर / रायगड जिल्हे

उपरोक्त पत्रानुसार मुख्याध्यापकांनी आपल्या स्तरावर नोंद घेवून त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी.

(ज्योत्स्ना शिंदे–पवार)
विभागीय सचिव (प्र.)
मुंबई विभागीय मंडळ,
वाशी, नवी मुंबई ४०० ७०३.

प्रतिः–
मुख्याध्यापक / प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा.
प्रत योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषितः–
1) मा. शिक्षण उपसंचालक, मुंबई.
२) शिक्षणाधिकारी(माध्य), ठाणे/रायगड/पालघर जिल्हा
३) शिक्षण निरीक्षक, पश्चिम/दक्षिण/उत्तर विभाग, मुंबई.
४) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, डहाणू/शहापूर/जव्हार/पेण.
यांनी आपल्या अधिपत्याखालील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळांना परिपत्रक निदर्शनास आणावे.

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) पुरवणी परीक्षा जून–जुलै २०२५

फक्त कार्यालयीन वापराकरिता

पुनर्परीक्षार्थी,नावनोंदणीप्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी,श्रेणीसुधार व तुरळक विषय घेवून प्रविष्ट विद्यार्थी यांचेकरीता शुल्काचा तक्ता

अतिविलंब शुल्क			विशेष अतिविलंब शुल्क			अतिविशेष अतिविलंब शुल्क		
प्रतिदिन प्रति विद्यार्थी रु.५०/–			प्रतिदिन प्रति विद्यार्थी रु.१००/–			प्रतिदिन प्रति विद्यार्थी रु.२००/–		
अ.क्र.	दिनांक	रक्कम	अ.क्र.	दिनांक	रक्कम	अ.क्र.	दिनांक	रक्कम
१	३०/०५/२०२५	५०/–	१०	०८/०६/२०२५	५५०/–	१८	१६/०६/२०२५	१४५०/–
२	३१/०५/२०२५	१००/–	११	०९/०६/२०२५	६५०/	१९	१७/०६/२०२५	१६५०/–
३	०१/०६/२०२५	१५०/–	१२	१०/०६/२०२५	७५०/–	२०	१८/०६/२०२५	१८५०/–
४	०२/०६/२०२५	२००/–	१३	११/०६/२०२५	८५०/–	२१	१९/०६/२०२५	२०५०/–
५	०३/०६/२०२५	२५०/–	१४	१२/०६/२०२५	९५०/–	२२	२०/०६/२०२५	२२५०/–
६	०४/०६/२०२५	३००/–	१५	१३/०६/२०२५	१०५०/–	२३	२१/०६/२०२५	२४५०/
७	०५/०६/२०२५	३५०/–	१६	१४/०६/२०२५	११५०/–	२४	२२/०६/२०२५	२६५०/
८	०६/०६/२०२५	४००/–	१७	१५/०६/२०२५	१२५०/–	२५	२३/०६/२०२५	२८५०/
९	०७/०६/२०२५	४५०/–						

(देविदास कुलाळ)
सचिव
राज्यमंडळ, पुणे–०४.